# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-23.05.2026** **वार- शनिवार**

---

**निवडणूक**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून या यादीत एकंदर ८६७ मतदारांचा समावेश आहे. त्यामध्ये ४४१ पुरुष व ४२६ महिला मतदारांचा समावेश असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी दिली.

प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करण्यासाठी २९ मे ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण ११ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

मतदानासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पात्र सदस्यांना मतदानाचा अधिकार राहणार आहे. पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपंचायत तसंच कॅन्टोन्मेंट बोर्ड क्षेत्र सदस्यांचा मतदार म्हणून समावेश करण्यात आला आहे.

**इंधन दरवाढ**

सार्वजिनिक क्षेत्रातल्या इंधन तेल कंपन्यांनी आज पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ केली. त्यामुळे पेट्रोल प्रति लिटर ८७ पैशांनी, तर डिजेल प्रति लिटर ९१ पैशांनी महागलं आहे. पश्चिम आशियात भूराजकीय संघर्ष सुरु झाल्यानंतर इंधन तेल पुरवठ्यात अडचणी निर्माण होऊन जागतिक स्तरावर इंधनाचे दर कडाडले आहेत.

**इंधन तुटवडा-इंडियन ऑइल**

देशात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा नसल्याची हमी इंडियन ऑईल या कंपनीनं ग्राहकांना तसंच सर्वसामान्य नागरिकांना दिली आहे. काही ठरावीक विक्री केंद्रांवर सध्या उद्भवलेली परिस्थिती ही केवळ स्थानिक पातळीवर असून तात्पुरत्या स्वरूपाची असल्याचं इंडियन ऑईलनं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**फडणवीस**

शेतकऱ्यांना आवश्यक तितका डिझेलचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना निर्देश दिले असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज शिर्डीत प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. ग्रामीण भागात इंधन सहज उपलब्ध होत नसल्यानं या सूचना केल्याचं ते म्हणाले. काही ठिकाणी इंधन विक्रीत अचानक २० ते ३० टक्के वाढ झाल्याकडेही फडणवीस यांनी लक्ष वेधलं आणि शेतकऱ्यांच्या नावानं इंधनाचा काळाबाजार करणाऱ्यांना इशारा दिला.

**नीटपेपरफूटी**

'नीट २०२६' पेपरफुटी प्रकरणात सीबीआयनं पुण्यातून आणखी एका शिक्षिकेला अटक केली आहे. मनीषा हवालदार असे अटक करण्यात आलेल्या शिक्षिकेचे नाव असून त्या भौतिकशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकेशी संबंधित असल्याचे तपासात समोर आले आहे.

**हिंस**

एसटी महामंडळानं यंदाच्या वारीसाठी राज्यभरातून ५ हजार ४०० बसगाड्यांची व्यवस्था केली आहे. सर्व बसगाड्यांची तांत्रिक तपासणी करून त्या रस्त्यात बंद पडणार नाहीत याची खात्री करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच पंढरपूर शहरात तात्पुरते बसस्थानक उभारून मोबाईल टॉयलेट आणि स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही प्रशासनानं  दिल्या आहेत.

**पालखी तयारी**

पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पालखी मार्ग, मुक्काम आणि विसावा स्थळांची प्रत्यक्ष पाहणी केली. वारकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयानं काम करत आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

**मेट्रोप्रवास**

पुणेकर आता उबर ॲप वरून मेट्रोचं तिकीट आरक्षित करू शकणार आहेत.'ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स'च्या माध्यमातून उबरनं ही सेवा सुरू केली असून त्यामुळे नागरिकांचा दैनंदिन प्रवास अधिक सोपा आणि वेगवान होणार आहे. या नव्या सुविधेमुळे प्रवाशांना आता थेट 'उबर' ॲपमधून मेट्रो प्रवासाचं नियोजन करता येणार आहे. दिल्ली, मुंबई, बंगळुरू आणि चेन्नईनंतर पुणे हे 'उबर'ची मेट्रो तिकीट सेवा सुरू झालेले देशातले पाचवं शहर ठरलं आहे.

**मेट्रो पाणी गळती**

मॉन्सूनपूर्व झालेल्या जोरदार पावसानंतर मेट्रोच्या भूमिगत स्थानकांमध्ये पाणी गळती झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेचे व्हिडिओ समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणात पसरत असून प्रवासी चिंता व्यक्त करत आहेत. पहिल्याच पावसात अशा प्रकारे पाणी गळती होणे हे प्रकल्पाच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका निर्माण करणारे असल्याची प्रतिक्रिया पुणेकरांकडून व्यक्त होत आहे. मेट्रो प्रशासनानं तातडीनं दुरुस्ती करून भविष्यात अशा घटना टाळाव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल तापमान 38 तर किमान 24 अंश सेल्सियस राहून दुपारनंतर आकाश ढगाळ राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**